# शिवकालीन प्रशासन



सपांदक
डॉ.मुक्ता गोविंदराव सोमवंशी
डॉ.अशोक काकासाहेब जाधव
डॉ.बळीराम रेश्माजी शिंदे

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

# शिवकालीन प्रशासन

संपादक
डॉ.मुक्ता गोविंदराव सोमवंशी
डॉ.अशोक काकासाहेब जाधव
डॉ.बळीराम रेश्माजी शिंदे
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय सोनपेठ
ता. सोनपेठ जि.परभणी

आधार पब्लिकेशन्स, अमरावती

# शिवकालीन प्रशासन

■ प्रथम आवृत्ती – १९, फेब्रुवारी २२

© प्रकाशक व संपादक

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.

हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,

वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती

मो. ९५९५५६०२७८

email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार

सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी

सरिता ग्राफिक्स,

कठोरा रोड, अमरावती

■ Price : 400/-

ISBN -978-93-91305-87-1

सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

PRINCIPAL

Late Ramesh Warpudkar (ACS)

College, Sonpeth Dist. Parbhani

| | | |
|---|---|---|
| 12 | स्वराज्य संस्थापक शिवाजी महाराज यांचा स्त्री विषयक दृष्टिकोन<br>प्रा. गोपाल विश्वनाथ चौधरी | 77 |
| 13 | शिवकालीन सैन प्रशासन मरकंटे कौशल्या रामचंद्र | 82 |
| 14 | शिवकालीन महसूल प्रशासन प्रफुल्ल लक्ष्मण किरवले | 92 |
| 15 | शिवकालीन राज्यव्यवस्था<br>प्रा. संदीप सुरेश देशमुख / प्रा.निखिल गणेश जगताप | 99 |
| 16 | छत्रपती शिवाजी महाराजांचे कृषिविषयक धोरण व जल व्यवस्थापन प्रा. डॉ. वितेश भारत निकते | 106 |
| 17 | शिवकालीन प्रशासनव्यवस्था प्रा. डॉ. जाधव अशोक | 117 |
| 18 | शिवाजी महाराजांचे स्त्री विषयक धोरण प्रा. किशम मिराशे | 127 |
| 19 | शिवकालीन किल्ले प्रशासन डॉ. मोहन मिसाळ | 136 |
| 20 | छत्रपती शिवाजी महाराजांची गुप्तहेर यंत्रणा व त्यांच्या धाडसी यशस्वी मोहिमा<br>डॉ.अंभुरे एस.डी. | 139 |
| 21 | शिवकालीन महसुल व्यवस्था अर्जुन अशोक मोरे | 145 |


Sonpeth Pin-431516 Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warp...
College...

# शिवकालीन प्रशासनव्यवस्था

प्रा. डॉ. जाधव अशोक
लोकप्रशासन विभाग, कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

**प्रस्तावना:**

शिवकालीन लोकजीवन हे शिवपूर्वकालीन जीवनापेक्षा पूर्णत: भिन्न होते असे नाही. परंतु नव्याने स्थापन झालेल्या स्वराज्यातील राजकीय व्यवस्थेचा इथल्या लोकजीवनावर अप्रत्यक्षरित्या प्रभाव पडलाच होता. त्यामुळे सामाजिक, धार्मिक, आर्थिक व स्त्री जीवनात काही महत्वपूर्ण असे बदल घडून आले. या बदलांच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांनी लोकजीवनातील सामाजिक, धार्मिक, आर्थिक व स्त्रीजीवनाला स्थैर्य प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे एकंदरीत लोकजीवनालाच स्थिरता प्राप्त झाली होती. त्या लोकजीवनाचा आढावा प्रस्तूत प्रकरणात घ्यावयाचा आहे.

**केंद्रिय प्रशासन :**

शिवकालीन प्रशासनव्यवस्था ही स्वराज्याच्या विस्ताराबरोबर विकसित झाली. स्वत: शिवाजी महाराज हे प्रशासनाचे प्रमुख होते. सर्व प्रकारचे अंतिम अधिकार हे छत्रपतीच्या हाती होते. भक्कम अशा प्रशासनव्यवस्थेच्या उभारणीकरिता स्वत: शिवाजी महाराजांनी शासनाच्या प्रमुख सात अंगांकडे विशेष लक्ष दिले होते. हे सात अंग म्हणजे १) राजा, २) मंत्री, ३) सुह्रद अथवा मित्र, ४) कोश म्हणजे खजिना, ५) राष्ट्र किंवा प्रदेश, ६) दुर्ग म्हणजे गड, कोट, जंजिरे आणि ७) सैन्य म्हणजे हुजुरात, कारभार इत्यादी. या प्रशासनव्यवस्थेच्या आधार असलेल्या सात भागांवर महाराजांनी विशेष लक्ष दिले होते. कारण यापैकी एखादेही अंग विकलांग वा कमकुवत झाल्यास राज्य नाश पावते हे त्यांनी ओळखले होते. त्यासाठी त्यांनी प्रशासनव्यवस्थेच्या सोयीसाठी राजमंडळ म्हणजेच अष्टप्रधान मंडळ निर्माण केले अर्थात स्वत:कडे असलेल्या सत्तेचे व काही प्रमाणात अधिकारांचे विकेंद्रिकरण प्रधानांकडे करून महाराजांनी प्रशासन लोकाभिमुख बनवण्याचा प्रयत्न केला.

केंद्रिय प्रशासन व्यवस्थेच्या केंद्रस्थानी स्वत: छत्रपती होते. अष्टप्रधान, त्यांच्या खात्यातील लहान–मोठे अधिकारी, १८ कारखाने व १२ महाल, सरसुभेदार, पायदळ, घोडदळ व आरमार या तिन्ही

लष्करी दलातील लहान—मोठे अधिकारी, हिशेब ठेवणारे चिटणीस, किल्लेदार इत्यादी अधिकारी मिळून मराठाशाहीत एक मोठी प्रशासन यंत्रणा उभी राहिली. या यंत्रणेच्या सर्वोच्च स्थानी स्वत: छत्रपती असल्यामुळे या यंत्रणेची कार्यक्षमता बऱ्याच प्रमाणावर छत्रपतींच्या कर्तबगारीवर अवलंबून होती. छत्रपती म्हणजे राज्यकारभारच्या यंत्रणेचा कणाच समजला जात होता. छत्रपती अनेकदा राजमंडळाचा सल्ला घेत असत. परंतु तो त्यांच्यावर बंधनकारक नसे. शिवाय सर्व राजमंडळाचे अष्टप्रधान अधिकारी छत्रपतीच नियुक्त करीत असत, त्यांच्या नेमणुकी करताना कर्तबगारी सोबतच कुल—शील—परंपरा, बुध्दिमत्ता, पूर्वी केलेली सेवा यांचा विचार केला जाई.

अष्टप्रधान मंडळ हे कारभारी मंडळ व न्यायमंडळ या दुहेरी कक्षेत काम करीत असे. या अष्टप्रधान मंडळाची निर्मिती ही शिवाजी महाराजांनी राज्यविस्ताराबरोबरच आवश्यकतेनुसार केली. राज्याभिषेक समारंभापर्यंत या मंडळात आठ प्रधान नियुक्त करण्यात आले होते. म्हणून या राजमंडळात अष्टप्रधान मंडळ असे म्हटले गेले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपले अष्टप्रधान मंडळ तयार करुन एक प्रकारची नवी शासनव्यवस्था निर्माण केली. एकंदरीत राज्यविस्ताराबरोबरच शासन व प्रशासनाच्या गरजेतूनच हे अष्टप्रधान मंडळ निर्माण झाले. महाराजांनी अत्यंत कल्पकतेने हे प्रधान मंडळ निर्माण केले होते. राज्याभिषेकासाठी तयार केलेल्या कानूजाबता मध्ये या अष्टप्रधान मंडळाची माहिती सविस्तरपणे आली आहे. याच कानुजाबत्यात अष्टप्रधानांची नेमणूक व त्यांच्या कार्याची निश्चिती महाराजांनी केलेली दिसते. या अष्टप्रधानांच्या हुद्याप्रमाणे प्रशासकीय अधिकार त्यांना देण्यात आले होते.

अष्टप्रधानांच्या माध्यमातून केंद्रिय प्रशासन स्थिर व लोकाभिमुख बनवण्याचा महाराजांनी प्रयत्न केला. राजदरबारात मुख्य प्रधान, अमान्य, सचिव व मंत्री हे महाराजांच्या उजवीकडे बसत असत तर सेनापती, सुमंत, न्यायधीश व पंडितराव हे महाराजांच्या डाव्या बाजूस बसत असत. मुख्य प्रधानांचा सालांना पगार पंधरा हजार होन, अमात्यांचा बारा हजार होन व इतर सहा मंत्र्याचा प्रत्येकी दहा हजार होन होता. या अष्टप्रधानांच्या हुद्याप्रमाणे राजकीय कारभार विभाजीत केला गेला होता. शिवकाळात प्रशासनातील पेशवा, सेनापतीपासून अगदी खालच्या पातळीवरील शिपाई—कारकुनापर्यंत प्रत्येकाने आपला

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

पगार धान्याच्या किंवा रोकडीच्या स्वरुपात सरकारी खजिन्यातून व कोठारांतून घ्यावा असा महाराजांचा दंडक होता. वेतन निश्चित स्वरुपात ठरवण्यात आले होते. महाराजांनी आपल्या एकाही प्रधानास जहागीर अथवा वतन दिलेले नव्हते. जहागिरी अथवा वतन दिल्यास त्या प्रांतातून तो अधिक महसूल वसूल करतो त्याचा रयतेला त्रास सहन करावा लागतो. शिवाय त्या प्रांताच्या महसुलाच्या बळावर तो सैन्य बाळगते व बंडखोरी करतो. त्यामुळे स्वराज्याला धोका निर्माण होवू शकतो म्हणून महाराजांनी ही वतन व्यवस्था महाराजांनी नाकारली होती.

प्रधानांना राज्याच्या महत्त्वाच्या निर्णयावर व कागदपत्रांवर मुद्रा कराव्या लागत. ही महाराजांनी रुढ केली होती. महत्त्वाचा निर्णय घेताना चुका होवू नयेत. तो निर्णय सर्वांच्या नजरेखालून जावा हा यामागील हेतू होता. त्याचबरोबर प्रधान मंडळात राज्यकारभाराची जाणीव वाढावी व कारभार अधिक कार्यक्षम व्हावा म्हणून महाराजांनी ही प्रथा पाडली होती. अष्टप्रधानांच्या हाताखाली अठरा कारखाने व बारा महालावरील अधिकारी असत. शिवाजी महाराजांनी निर्माण केलेली ही प्रशासनव्यवस्था म्हणजे राजकीय व सामाजिक जीवनात केलेली एक क्रांतीच होती. याद्वारे महाराजांनी स्वराज्याचे प्रशासन अधिकाधिक लोकाभिमुख केले. ही प्रशासनव्यवस्था शाहू महाराजांच्या पूर्वकालापर्यंत कायम राखली गेली.

**प्रांतिय प्रशासन :**

शिवकाळात केंद्रिय प्रशासन हे अष्टप्रधानांच्या माध्यमातून चालवले जाई. तसेच प्रांतांच्या प्रशासनाकरिता अष्टप्रधानांच्या स्वाधीन काही प्रांत सुपूर्द करण्यात आले होते. त्यांना नेमून दिलेल्या प्रांतांची प्रशासकीय व्यवस्था पाहण्याचे काम प्रधान करत असत. त्यामुळे प्रांतिय प्रशासन केंद्रीय प्रशासनास व पर्यायाने छत्रपतींशी जोडल्या गेल्या होते. स्वराज्याचा कारभार सुरळीत चालावा या हेतूने राज्याचे मुख्य दोन विभाग तयार केले होते. एक सलग व एकत्रित असलेल्या प्रदेशाचा भाग तर दुसरा म्हणजे दक्षिणेकडील विखुरलेल्या प्रदेशाचा भाग पहिल्या सलग असलेला प्रदेशाच्या पहिल्या विभागाचे तीन उपविभागात विभाजन करण्यात आले होते.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516

१. उत्तरेकडील प्रदेश २. मध्यविभाग ३. पूर्वेकडील विभाग ४. कर्नाटक

या विभांगावर देखरेखीसाठी प्रशासकीय अधिकारी म्हणून सरसुभेदाराची नेमणूक केली जाई. सरसभेुदाराच्या या विभागीय कचेरीत प्रांत राजमंडळ असे म्हटले जाई. विभागाच्या सरसभेुदारासच मुख्य देशाधिकारी असे म्हणत असत. तर विभागास सरसुभा असे म्हटले जाई एका सरसुभ्यात दोन ते तीन सुभे किंवा त्यापेक्षा अधिक सुभ्यांचा समावेश होत असे. सुभ्याच्या कामावर लक्ष रहावे व सुभ्याचा कारभार चोख पार पाडावा याकरिता सरसुभेदारांची नेमणूक करण्यात आली असावी. सध्या महाराष्ट्रात असलेला महसुली विभाग म्हणजेच महाराजांनी निर्माण केलेले सरसुभे होय. यावरुन महाराजांनी प्रांतीय प्रशासनात ही अधिकार शृंखला व जबाबदार अशी व्यवस्था निर्माण केलेली होती हे लक्षात येते.

**१. सुभा:**

सुलतानशाहीत किंवा मोगल प्रशासनात परगणा म्हणून जो मुलकी विभाग होता तोच स्वराज्यात सुभा या नावाने ओळखला जाई. दोन महाल मिळून लाख–सवालाख महसुलाच्या उत्पन्नाचा एक सुभा होई. सुभ्याच्या कचेरीस दिवाण–सुभा असे म्हणत असत. सुभ्यातील महसुलाच्या वसुलीचे, न्यायाचे, राजकीय व प्रशासकीय बंदोबस्त इत्यादी संबंधीचे काम सुभा दिवाणातून चाले.

**२. सभेुदार :**

सुभ्याच्या प्रमुखास सभेुदार असे म्हटले जाई. सुभेदार व महालांतील अधिकारी यांच्या नेमणुकीसंबंधी महाराजांची शिस्त नियमित होती. अष्टप्रधानांच्या दप्तरात म्हणजेच कचेरीत काम करणाऱ्या हुशार व कर्तव्यदक्ष व कर्तबगार व्यक्तीस हवालदार, मुजूमदार व सुभेदार बनवले जाई. सुभ्याच्या कारभाराची जबाबदारी सुभेदारावर असे. सुभेदाराच्या मदतीस मुजुमदार, निघावन म्हणजे त्याच्या हाताखालचा कारकून, चिटणीस, सभासद, सबनीस व पोतनीस असे या शिवाय अन्य अधिकारीही असत.

सुभ्याच्या बंदोबस्तासाठी सुभेदाराकडे शिबंदी म्हणजे पायदळ सैन्य असे. त्यावर हवालदार असे तर सुभ्याच्या आर्थिक व्यवहाराच्या हिशोबाचे काम मुजुमदार करीत असे. सुभेदारास सालीना ४०० होन तर मुजुमदारास सव्वाशे होन वेतन स्वरुपात मिळत असत. सुभेदाराच्या

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

तैनातीत पालखी असे. सुभ्याच्या अखत्यारीत येणाऱ्या किल्ल्याचे हवालदार हे सुभेदाराच्या नियंत्रणात असत. सुभेदारास सुभ्यातील सरकारी महसूल वसुलीचे काम महाल व ग्राम प्रशासनातील परंपरागत वतनी अधिकाऱ्यांकडून करावे लागत असे. सुभेदारास हे वतनी अधिकारी मदत करीत असत.

३. महाल:

दोन किंवा त्यापेक्षा अधिक महाल मिळून सुभा बनत असे. तर लोकरुढ देश निर्मित विभागात महाल, तपे, तर्फ इत्यादी नावांनी शिवकाळात गावांचा मिळून बनत असे. महालावरील अधिकाऱ्यास हवालदार म्हणत. व त्याच्याबरोबर हिशेब पाहणारा अधिकारी मुजुमदार या नावाने ओळखला जाई. त्यांना ३ ते ५ होनपर्यंत वेतन मिळत असे. महालाच्या सुरक्षेसाठी थोडी शिबंदीही असे त्यावर 'नाईक' हुद्देदार नेमलेला असे. काही महालांच्या गावी बाजार भरीत व त्यात हरतेऱ्हेच्या खेडयात तयार झालेल्या वस्तू मिळत.

महाल प्रमुख हवालदारास गावोगाव फिरुन महसूल जमा करावा लागे. तो जमा करत असताना पारंपारिक वतनी अधिकारी देशमुख, देशपांडे, पाटील कुलकर्णी हे हवालदारास मदत करीत असत. मोठया महालांना तर्फेच्या ऐवजी प्रान्त म्हणत असत. या प्रांतीय प्रशासनातील संख्या व त्यांचे प्रमुख हे केंद्रिय प्रशासनाशी व ग्राम प्रशासनाशी जोडलेले होते. त्यामुळे प्रांतीय प्रशासन हे केंद्रिय प्रशासन व ग्रामप्रशासनातील दुवा म्हणून काम करताना दिसते.

**ग्रामप्रशासन:**

शिवकालीन राज्यातील प्रशासन व्यवस्थेचा सर्वात लहान घटक म्हणजे गाव, ग्राम अथवा मौजे होय. ग्राम प्रशासन व्यवस्था ही पारंपरिक पध्दतीनेच चालत होती. ग्राम प्रशासन व्यवस्थेत गावातील रहिवाशी हे केंद्रस्थानी एकवटलेली असे. गावातील जवळपास सर्वच लोकांचे चरितार्थाचे व उत्पन्नाचे साधन शेती हेच होते. म्हणून ग्राम प्रशासनही शेती व्यवसायाशी निगडीत होते. गावाचा तत्कालीन कागदपत्रांमध्ये ग्राम, देहे, मौजे, खेडे इत्यादी अनेक नावांनी उल्लेख केलेला आढळतो. गावाच्या उपविभागांना माजरा, वाडीपाडी, खारी इत्यादी नावे आढळतात. ग्राम, मौजे, देहे, खेडे ही समानार्थी नावे तरी मौजे हे गावासाठी अधिक प्रचलित असलेले नाव होते. दोन गावे जर एकमेकांना लागून वसलेली असतील तर त्यातील मोठया गावास

Late Ramesh Warpudkar A.C.S. College Sonpeth Pin-431516 Parbhani

'बुद्रुक' आणि लहान गावास 'खुर्द' असे म्हणत. गावाच्या उपविभागाला किंवा उप नगराला सामान्यत: माजरा म्हणत असत. काही वेळा शेत जमीनीवर एखादी वस्ती तयार झाली असेल तर वाडी, पाडी, खारी आणि माजरा ही अशी वस्त्यांची समानार्थी नावे वापरली जात. वाडी हे नाव अशा वस्त्यांसाठी जास्त प्रचलित होती. समुद्र किनाऱ्यालगत असणाऱ्या गावांना खारी असे नाव पडले असावे. ज्या ठिकाणी कारागीर, कसबी कलाकारांचे प्रमाण जास्त असे अशा वस्तीला कसबा असे नाव देण्यात येत असे. अशा कसब्यामध्ये आठवडयाचा बाजार भरत असे. ज्या बाजारांच्या ठिकाणी मोठया प्रमाणात देवाणघेवाण आणि आर्थिक उलाढली होत असत तेंव्हा त्यास 'पेठ' असे म्हणण्यात येवू लागले. तर समुद्रकिनाऱ्यालगत असलेला बंदरास 'मिरा' असे म्हणत असत.

गावात पुर्वापार राहत असलेल्या रहिवाशी हेच गावाचे प्रशासन आणि इतर घडामोडी यांचे निरीक्षण करीत वंशपरंपरेने ते गावाची व्यवस्था पाहत असत, पिढीजात गावाचे प्रशासन पाहणाऱ्या हया अधिकाऱ्यांचा दर्जा फार श्रेष्ठ होता. गावातील काही जमिनीचे ते मालक असत. आणि शासनातर्फेही त्यांना अधिक उत्पन्न प्राप्त होत असे. गावातील हवालदार, मुजुमदार इत्यादी अधिकाऱ्यांपेक्षा देशक वेगळे होते. ते पूर्वीपासूनच चालत आलेल्या वतन परंपरेतील अधिकारी होते. त्यांचे ग्रामप्रशासनात विशेष महत्त्व होते.

**१. पाटील :**

'गावचा वंशपरंपरागत अधिकारी पाटील असे. हाच गावचा प्रमुख अधिकारी असे. यालाच ग्रामीणी अथवा ग्रामप अशी संज्ञा होती. राज्यव्यवहार कोशात यालाच 'ग्रामगापेकर' असे म्हटले आहे. समकालीन कागदपत्रांतून त्याचा उल्लेख गाव पाटील, मोकदम अथवा मोकदम पाटील असा उल्लेख आला आहे. पाटीलकीचा संबंध गावच्या वसाहतीशी असे. काळया जमिनीवर जेंव्हा वसाहतीला सुरुवात झाली तेव्हापासूनच पाटीलकीचा उदय झाला असे म्हटले जाते. लावणी संचणी, उगवणी ही पाटलाची प्रमुख कामे समजली जात.

पाटील हा गोतसत्तेचा प्रमुख असे. या गोत सत्तेत वतनदार, बलुतेदार आणि मिरासदार यांचा समोवश असे. गावचा महसूल निश्चित करण्याची कामगिरी राजसत्तेची असली तरी, महसूल वसूल करणाऱ्या अधिकाऱ्यांना पाटलाची संमती घेतल्याशिवाय किंवा

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

त्यांच्याशी विचारविनिमय केल्याशिवाय अंतिम निर्णय घेता येत नव्हता. पाटील कुलकर्ण्याच्या सहाय्याने प्रतिवर्षी गावाच्या संभाव्य उत्पन्नाचे अंदाजपत्रक तयार करत असे. गोतसत्तेचा तो प्रमुख असल्याने या सत्तेचा सर्व सभांचे संचालन तो करीत असे. गावात शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्याची जबाबदारी त्याचीच असे. गावचा पाटील हा प्रामुख्याने मराठा समाजातील असे परंतु असे असले तरी काही ठिकाणी ब्राह्मन, जैन, लिंगायत अथवा अन्य जातीचे पाटील असल्याचीही तुरळक उदाहरणे शिवकाळात आढळतात. पाटीकीच्या सनदेतच पाटलाने उपभोगावयाच्या हकलाजिमांची नोंद असे. शिवाय जगात विशेष मानपानही मिळत असत सारांशत:, शिवकालीन वतनदारी व्यवस्थेतील पाटील हा एक महत्त्वाचा वतनदार होता.

**२. कुलकर्णी :**

'गावाचा दुय्यम दर्जाचा अधिकरी आणि पाटलाचा सहाय्यक म्हणून कुलकर्णी ओळखला जाई. कागदपत्रांतून त्याचा उल्लेख 'गावकुलकर्णी' अथवा 'ग्रामलेखी' असा केला आहे. काही सनदांमधून या वतनदाराचा उल्लेख लेखनवृत्ती असाही केला आहे. थोडक्यात गावातील जमीन किती आहे. त्याच्यावर सरकारी सारा किती आकारला आहे याचा तपशील कुलकर्णी आपल्या दप्तरात ठेवित असे.' पाटलाप्रमाणेच कुलकर्ण्यानेही गावच्या लावणी—संचणीच्या कामात लक्ष द्यावे व शेती विकासासाठी प्रयत्न करावेत असे कागदपत्रांत म्हटले आहे. पाटलाप्रमाणे प्रत्येक गावात कुलकर्णी वतनदार नसे. कारण तत्कालात कारकुनी काम करण्यास आवश्यक तेवढया शिक्षित लोकांचा तुडवडा असावा. किंवा कुलकर्णी वतनदाराची प्रत्येक गावाला आवश्यकता भासत नसावी. त्यामुळे शिवकाळात एकच कुलकर्णी अनेक खेडयांच्या हिशोबाचे काम पाहत असल्याचे दिसून येते. एखाद्या कुलकर्ण्याकडे अनेक गावे वंशपरंपरेने आली असल्यास आणि त्या सर्व गावांचे काम त्याला एकटयाला झेपत नसल्यास तो आपले हस्तक अथवा मुलानी एखाद्या गावात नेमत असे.

मध्ययुगाच्या प्रारंभी कुलकर्णी वतन हे वंशपरंपरागत अथवा शाश्वत स्वरुपाचे नसावे. पण काळाच्या ओघात ते तसे बनले असावे. एखाद्या गावचे कुलकर्णी निर्वंश झाले तर गावकरी तात्पुरता मुतालिक नेमून गावकीचे काम त्याच्याकडून करवून घेत असत. कोकणातील काही भागात कुलकर्णी वतन वंशपरंपरागत नव्हते. १६५६ मध्ये



Late Ramesh Warpudkar A.C.S. College Sonpeth Pin-431516 Parbhani

कोकणचा भाग जिंकल्यानंतर शिवाजी महाराजांनी वतनदार कुलकर्ण्यांची त्या परिसरात नियुक्ती केली. कुलकर्णी वतनदाराच्या सनदेत त्यांना मिळणाऱ्या हकलाजिमांची नोंद केलेली असे. त्यांचे हक्क पाटलासारखे असले तरी त्यांना मिळणारा हकलाजिमा कमी प्रमाणात असे. याशिवायही त्या त्या गावानूसार अनेक वस्तु त्यांना भेट स्वरुपात मिळत असत. ग्रामप्रशासनातील दप्तर नोंदीच्या कामात कुलकर्णी वतनदारही महत्त्वाची भुमिका बजावत असे.

**३. चौगुला:**

गावातील किंवा ग्रामप्रशासनात चौगुला हा शिवकालीन आणखी एक महत्त्वाचा वतनदार असे. राज्यव्यवहारकोशात त्याला ग्रामणी असे म्हटले आहे. मुळ शब्द चौकुला असा असून त्याचा अर्थ चार कुळे बाळगणारा असा असावा. चौगुला हा गावकीच्या कामामध्ये पाटलाचा सहाय्यक म्हणून काम करीत असावा. सारावसुलीचा कामात पाटलाला चौगुलाची भरपूर मदत होत असे. गोतसभेतही चौगुलाची भूमिका महत्त्वाची असे. कागदपत्रांमध्ये बऱ्याच ठिकाणी देश चौगुला असाही शब्द आढळतो. हा परगण्याच्या वतनदारांचाही अधिकारी असावा. काठी ही चौगुल्याची निशाणी होत म्हणजेच त्याचा संबंध जमीन मोजणीशी असावा. या कामात पाटलाला मदत करीत असावा. चौगुला हा सामान्यत: मराठा समाजातील असे परंतु काही ठिकाणी अन्य समाजातील चौगुल्यांचेही उल्लेख आढळतात.

**४. शेटे—महाजन :**

गाव पातळीवरील वतनदार वर्गामध्ये शेटे—महाजन यांचाही समावेश होता. गावातील पेठेचे बाजारपेठ ते वंशपरंपरागत अधिकारी होत. पेठ ही काही प्रत्येक गावात नसे. परंतु ज्या ज्या ठिकाणी पेठ असे त्या त्या ठिकाणी हा शेटे—महाजनांचा वतनदार वर्ग असे त्यांचे अधिकार ही इतर वतनदारांप्रमाणेच वंशपरंपरागत होते. गावची वसाहत जशी पाटलाची जबाबदारी तशी पेठेची जबाबदारी शेटेची असे कुलकर्ण्याप्रमाणे पेठेची अथवा पेठेतील व्यवहाराच्या नोंदी ठेवण्याचे काम शेटे—महाजन करीत असत. याशिवाय गावात सावकारीचे व्यवहार शेटे—महाजन करीत असत. 'तराजू' ही त्यांची व्यावसायिक निशाणी होती. सरकारी कागदपत्रांवर त्यांच्या नावासमोर तराजूचे चिन्ह असे. याशिवाय गोतसभेच्या कामकाजातही ते अधिकृतपणे भाग घेत असत.

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Pin-431516 Ta. Sonpeth Dist. Parbhani

५. देशमुख आणि देशपांडे :

ग्राम प्रशासनाप्रमाणेच परगण्याचे प्रशासनात देशमुख–देशपांडे हे वतनदार महत्त्वाचे होते. देशमुख आणि देशपांडे हे परगण्याचे वतनदार होते. परगण्यांतील सर्व पाटलांचा नायक प्रमुख देशमुख असे तर देशपांडे हा सर्व कुलकर्ण्यांचा नायक असे.

देशमुख वतन हे साधारणत: मराठा समाजाकडे असे अपवादात्मक ठिकाणी हे वतन ब्राह्मणांच्याकडे ही दिसते धर्मांतरामुळे काही ठिकाणी या वतनावर मुस्लिम अधिकारीही दिसतात. आपल्या परगण्यातील पाटलांच्या कामावर देशमुख देखरेख ठेवीत असत. परगण्यातील रयतेची स्थिती जाणून घेण्यासाठी तो आपल्या परगण्यात वार्षिक दौरा काढीत असत. सरकार आणि रयत यांना जोडणारा देशमुख हा महत्त्वाचा दुवा होता. सरकारचे आणि रयतेचे प्रतिनिधित्व देशमुख करत असे. याशिवाय एखाद्या मोहिमेत सरकारला आवश्यकता असेल तर मदत ही देशमुखांना करावी लागे.

देशमुख ही संस्था जुनी आहे. मध्ययुगापूर्वी जे परगण्याचा कारभार पाहणारे त्यांना 'विषयपती' असे म्हणत. मध्ययुगात आणि मराठा काळात 'देशमुख' या संज्ञेचा वापर रुढ झाला असावा. बऱ्याच कागदपत्रांमध्ये, बखरीत 'जमीनदार' हा शब्दही देशमुख या अर्थानेच वापरलेला असावा. कर्नाटकात देशमुखांना 'नाडगौडा' आणि कोकणात 'देसाई' अशा संज्ञा वापरलेल्या आहेत. एकंदरीत परगण्याच्या व्यवस्थेत देशमुख या वतनदारांची भुमिका महत्त्वपूर्ण होती.

देशपांडे परगण्यातील कुलकर्ण्यांच्या कामावर देखरेख ठेवण्याचे काम करीत असत. हे देशपांडयांचे प्रमुख कार्य असल्यामुळेच त्यांना 'देशलेखक' अथवा 'देशकुलकर्णी' असे म्हटले आहे गावात कुलकर्ण्यांचे जे काम तेच परगण्यात देशपांडे करीत असत. परगण्याच्या कामासाठी देशपांडे देशमुखांना जबाबदार असत. या कामाबद्दल त्यांना सरकारातून वतन मिळत असे. परगण्याचे हिशोब ठेवणे, तपासणे हे त्यांचे मुख्य काम होते. या कामाच्या बदल्यात देशमुख देशपांडे या वतनदारांना सनदेनुसार काही हक्क व त्यांचे हकलाजिमा ठरलेला असे. गावातील वतनदारांच्या तुलनेत अधिकार आणि मिळणारा हकल जिमाही त्यांना अधिकचा असे.

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Tq. ... Parbhani

संदर्भ सूची :

१. पगडी सेतुमाधवराव .(संपा.),(१९६४), मोगल मराठा संघर्ष, चित्रशाळा प्रेस, पुणे.

२. गंगथडे व बेंजीलवार, मराठयांचा इतिहास, शौर्य पब्लिकेशन, लातूर, २०२२

३. बेंद्रे वा. सी. (१९६०), छत्रपती संभाजी महाराज यांचे चरित्र, वा. सी. ब्रेंद्रे पुणे,

४. सरदेसाई, गो.स., (१९८९), मराठी रियासत, (खंड पहिला), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

५. रोडे सोमनाथ, (१९९८) मराठ्यांचा इतिहास, पिंपळापूरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.

६. पवार जयसिंहराव, (१९९६) मराठी सत्तेचा उदय, के. जे. शहा विनायक प्रिंटर्स, पुणे

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani